महाराष्ट्र शासन

# प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प

नंदुरबार याहा मोगी चौक नवापूर रोड नंदुरबार

दूरध्वनी क्र.-02564-210303, Email:-poitdp.ndb-mh@gov.in

जाक्र भांडार-- शाआशा /दुधपुर -2018/प्र.क्र57/ का 6(1)/ 271/2019 दिनांक :- 17 जानेवारी, 2019

प्रति,

1) गुरुकृपा ॲन्ड कंपनी,
N/43- JD1/15/4 पवन नगर,
सिडको,नाशिक

2) अकुल ट्रेडर्स,
20, सहजिवन नगर, धुळे

3) विश्वभारती, फुडस प्रा. लि.
कलंत्री हाऊस शिवाजी रोड,
नाशिक

4) सब जनरल सप्लायर्स,
प्लॉट नंबर 34 श्रीकृष्ण निवास
गोविंदनगर, नाशिक

5) अध्यक्ष,श्री बालाजी सुशिक्षीत बेरोजगार
स्वंयरोजगार सहकारी संस्था मर्या.तळोदा
ता.तळोदा जि.नंदुरबार

विषय :- शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी दुध (टेट्रा पॅक) पुरवठा करणे बाबत.
संदर्भ :- सन2018-2019 या वर्षातील ई- निविदा क्र.6265 बाबतआपण घेतलेले आक्षेप.

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर करण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना दुध (टेट्रा पॅक) पुरवठा करण्यासाठी या कार्यालयाच्या स्तरावरून ई- निविदा क्रमांक 6007 व 6265 मागविण्यात आलेल्या आहेत. सदर निविदेत आपण भाग घेतला आहे तथापी निविदा क्रमांक 6007 मध्ये एकूण 2 निविदाकार तांत्रिक लिफाफ्यानुसार पात्र ठरत असल्याने नविन निविदा क्रमांक 6265 घेऊन निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.सदर निविदा मध्ये एकूण 3 निविदाकार यांनी भाग घेतला असून तिन्ही निविदाकार तांत्रिकदृष्टया पात्र होत आहे.

त्यानुसार आपणांस सुचित करण्यात येते की, निविदा क्रमांक 6265 मधील पात्र निविदाकार यांचे बाबत दिनांक 14 डिसेंबर 2018 पर्यंत आक्षेप नोंदविण्या बाबत आपणांस संदर्भिय 2 च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानुसार आपणाकडून या कार्यालयास सादर केलेल्या आक्षेपा बाबत खरेदी समितीने घेतलेले निर्णयाबाबतचे विवरणपत्र या सोबत जोडलेले आहे. सदर निर्णया बाबत आपले आक्षेप असल्यास दिनांक 18 जानेवारी, 2019 रोजी ठिक दुपारी 4.00 वाजे पर्यंत या कार्यालयास सादर करावे. तसेच पात्र निविदाकार यांचे दिनांक 18 जानेवारी, 2019 रोजी ठिक दुपारी 5.00 वाजता व्यापारी लिफाफा उघडण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याने प्रकल्प कार्यालय नंदुरबार येथे उपस्थित राहावे ही विनंती.

पी.बी.देसाई (स.प्र.अ.)
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
नंदुरबार

Scanned by CamScanner

शासकीय आश्रम शाळांना दुध (टेट्रा पॅक) पुरवठा निविदेतील आक्षेप पुर्तता बाबत.

| अ. क्र. | निविदाकार यांनी कागदपत्रा बाबत आक्षेप नोंदविल्या बाबत | श्री बालाजी सुशिक्षीत बेरोजगार सेवा सह संस्था तळोदा | विश्वभारती फुड प्रा.लि. | सब जनरल सप्लायर्स, नाशिक | खरेदी समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| 1 | बयाणा रक्कम भरणा केली आहे किंवा नाही सुट संदर्भात प्रमाणपत्र जोडले आहे किंवा कसे | बयाणा रक्कम भरणा केली नाही | आहे | बयाणा रक्कम भरलेली नाही | शासन निर्णय 1.12.2016 नुसार अधिकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र असल्याने सुट ग्राहय धरण्यात आलेली आहे. |
| 2 | अन्न औषध प्रशासन कार्यालयाची अनुज्ञप्ती / प्रमाणपत्र ( अन्न सुरक्षा व मानदे अधिनियम-2006 नियमामवली -2.1.4(6) अन्वये दिलेले प्रमाणपत्र) दिनांक 1.1.2018 रोजी विधी ग्राहय असलेले | -- | सदरचा दाखला जळगाव येथील आहे | -- | सदर संस्थेचे कार्यक्षेत्र हे जळगाव, नाशिक व धुळे येथील असल्याने सदर अन्न औषध प्रशासन कार्यालयाची अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जळगाव येथील आहे सदर प्रमाणपत्र खरेदी समितीने ग्राहय धरले आहे. |
| 3 | उत्पादक संदर्भात परवान्याची सांक्षकित प्रत (License) अथवा अधिकृत विक्रीते असलेल्या निविदाकाराने विक्रीते म्हणुन नेमणुकी संदर्भात् कंपनीच्या लेटर हेट वर परवान्याची /प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत जोडावी. (License) (प्रपत्र -4 ) | सदर परवाना हा तळोदा प्रकल्प साठी देण्यात आलेले आहे. | -- | -- | सदर प्रमाणपत्र खरेदी समितीने ग्राहय धरले आहे. |
| 4 | 31मार्च 2017 पर्यतचे मुल्यवर्धीत कर VAT/CST निपटारा प्रमाणपत्र. (Maharashtra Value Added Tax Act 2002 अंतर्गत From no 415 निपटारा प्रमाणपत्र | - | - | नोंदणी प्रमाणपत्र व निपटारा प्रमाणपत्र नाही | सदर निविदाकार यांनी चलन जोडलेले असल्याने खरेदी समितीने सहमती दर्शविली आहे. |
| 5 | निविदाकार यांची दिनांक 01.04.2014 ते 31.03.2017 पर्यतची तीन वर्षाची उलाढाल 1.50 कोटी (अक्षरी --एक कोटी पन्नास लाख मात्र) रुपयां पेक्षा अधिक असल्या बाबतचे सनदी लेखापालाचा (Charterd Accountant) प्रमाणपत्र (प्रपत्र- 5 ) | - | -- | आर्थिक उलाढाल 3 कोटी पेक्षा कमी आहे. | सब जनरल सप्लायर्स नाशिक यांचे सन 2015-2016 या एकच वर्षाकरीता 4 कोटी असल्याने सबब सदर निविदाकार यांची उलाढाल प्रमाणपत्र ग्राहय धरले आहे. |
| 6 | संस्था नोंदणी प्रमाणपत्र (संस्था नोंदणी अधिनियम 1950 व 1860) / बचत गट नोंदणीचे प्रमाणपत्र MSRLM/DRDA/MAVM/DUDA/SHG यांच्या अंतर्गत नोंदणीकृत अथवा प्राधिृति बचत टिंाचे प्रमाणपत्र ( सक्षम प्रधिका-या मार्फत निर्गमीत प्रमाणत्र) | -- | संस्था नोंदणी नाशिक येथील आहे | -- | संस्था नोंदणी प्रमाणपत्र हे नाशिकचे असले तरी सदर संस्थेचा पत्ता हा नाशिक येथील असल्यामुळे सदर नोंदणी प्रमाणपत्र ग्राहय आहे. |
| 7 | आश्रम शाळेवर दुध पुरवठयासाठी निवीदाकाराकडे स्वत:ची उपलब्ध असलेले वाहन परवान्याच्या प्रती अथवा भाडे कराराद्वारे वाहन उपलब्ध असल्यास त्या वाहनाच्या वाहन परवान्याच्या प्रती व केलेला करारनाम्याची प्रत. (प्रपत्र -9 ) | - | - | करारनामा व वाहन मालक वेगवेगळे आहेत | हेमराज माधवराव आघाव यांचे स्वता: चे वाहन आहे |
| 8 | निवीदाधारकास शासकीय / निमशासकीय संस्थेत दुध पुरवठयाचा अनुभव आवश्यक राहिल. या करीता निविदे सोबतचे प्रमाणत्र सक्षम प्रधिकारी यांनी निर्गमीत केलेले (प्रपत्र- 7 ) हे पुराव्यासह (कार्यरभ आदेश प्रत सह) | अनुभवा संदर्भात खाजगी संस्थेचा असुन त्या बाबत सदर संस्थेकडून पुरवा मागविण्यात यावा | खाजगी संस्थेचा अनुभवा संदर्भात संस्थेकडून पुरवा मागविण्यात यावा | - | विश्वभारती फुड प्रा.लि. या संस्थेचे प्रकल्प कार्यालय जव्हार यांचे दुध पुरवठा आदेश देण्यात आलेले असल्याने तसेच खाजगी संस्थे बाबत खरेदी समितीने सदरचा अनुभव मान्य केलेला आहे. |
| 9 | निवीदाकाराने लिफाफा क्रमांक 1 सोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या सत्यतेसाठी हमी पत्र सादर करणे बंधनकारक राहिल. (प्रपत्र- 6) | स्वसांक्षाकीत केलेले नाही | स्वसांक्षाकीत केलेले नाही | स्वसांक्षाकीत केलेले नाही | निविदाधारक यांचे मुळ कागदपत्र ऑनलाईन सादर केलेले आहे त्यावर स्वसाक्षांकिंत आवश्यकता नाही. |

वरील प्रमाणे निर्णय खरेदी समितीने एकमताने घेतला आहे.

| सदस्य | सदस्य | सदस्य सचिव | सदस्य | सदस्य | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|---|
| [illegible]हपाल आ. मु.वगृ शहादा | मुख्याध्यापक शाआशा देवमोगरा | सहा. लेखाधिकारी ए.आ.वि.प्र नंदुरबार | स. प्र.अ.(शिक्षण) ए.आ.वि.प्र नंदुरबार | स. प्र.अ.( भांडार )ए.आ.वि.प्र नंदुरबार | प्रकल्प अधिकारी, ए.आ.वि.प्र नंदुरबार |

Scanned by CamScanner